महाराष्ट्र शासन
वन विभाग
# वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त, नागपूर यांचे कार्यालय
(नवीन प्रशासकिय इमारत, वन भवन, भवन्स स्कुल समोर, नागपूर 440 001.)
(Land Line No - 0712-2564569, Email-id : ccftnagpur@mahaforest.gov.in)

क्र.कक्ष-10/जमीन/प्र.क्र. 956/2024-25/ 1315 दिनांक : 08 जुलै 2024

प्रति,
उपवनसंरक्षक,
भंडारा वनविभाग, भंडारा.

विषय:- Forest Land Bhandara
Proposal for diversion of 3.84 ha. Bade Jhad ka Jungle and Zudpi Jungle Forest land in favour of M/s. Ashok Leyland Ltd; for non forestry use i.e for Industrial Unit of Ashok Leyland in District Bhandara in the State of Maharashtra State.

संदर्भ :- 1) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचे कडील पत्र क्र कक्ष-17/ नोडल/77, दिनांक 08/04/2022.
2) या कार्यालयाचे पत्र क्र कक्ष-10/जमीन/प्र.क्र.956/87, दिनांक 14/04/2023.
3) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचे कडील पत्र क्र कक्ष-17/ नोडल/592, दिनांक 25/05/2022.
4) या कार्यालयाचे पत्र क्र कक्ष-10/जमीन/प्र.क्र.956/899, दिनांक 29/05/2024.
5) आपले कार्यालयाचे पत्र क्र कक्ष-8/सर्व्हे/प्र.क्र.480/336, दि.28/06/2024.

विषयांकित प्रकरणी या कार्यालयाचे पत्र क्र कक्ष-10/जमीन/प्र.क्र./1287, दिनांक 22/02/2022 अन्वये मौजा चिखली हमेशा व मौजा गडेगाव येथील झुडपी जंगल सर्व्हे क्र. 1,47,57 व 113 मधील वनजमिन वळतीकरणाचा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडे सादर करण्यात आला असता, त्यांचेकडील संदर्भिय पत्र क्र 1 अन्वये निर्देश दिले होते की, प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुबंई खंडपीठ नागपूर यांचे आदेशानुसार प्रकल्प यंत्रणेस प्रकल्प चालविणेकरिता आवश्यक वनजमीन चा प्रस्ताव आणि गेले 40 वर्षापासुन अतिक्रमित केलेले 10.37 हे. क्षेत्राचा वनभंगाचा प्रस्ताव सादर करावा, आणि 3.84 हे. वनक्षेत्र प्रकल्पाकरिता वळतीकरण करणेबाबतचा प्रस्ताव सादर केला असल्याने उर्वरित 6.53 हे. क्षेत्राकरिता दंडनीय नक्त मुल्य आकारणेबाबत शिफारस करावी, तसेच 6.53 हे.आर क्षेत्र महसुली वनक्षेत्र असल्याने त्याचा ताबा महसुल विभागास देण्यात आला असुन तसा पंचनामा व ताबा देण्यात आला असल्याबाबतचा अहवाल या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र 2 अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांना सादर केलेला होता.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडील संदर्भिय पत्र क्र 3 अन्वये जर सदरचे जमिनीचा मुळ उल्लेख वनजमीन असा आहे, तर सदरची 6.53 हे. जमीन वनविभागाने ताब्यात घेवून तसा अहवाल सादर करणेबाबत कळविलेले होते. त्याअनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र 4 अन्वये विषयांकित प्रकरणी कार्यवाही होवून सुधारित अहवाल तात्काळ सादर करणेबाबत कळविलेले होते. त्यानुसार आपलेकडील संदर्भिय पत्र क्र 5 अन्वये अहवाल सादर केलेला असुन सदर अहवालाचे संस्करण केले असता खालीलप्रमाणे त्रुटी निर्दशनास आलेली आहे.



Scanned with OKEN Scanner

प्रकल्प यंत्रणेने 6.53 हे.आर महसुली वनक्षेत्राचा ताबा दिनांक 24/03/2023 रोजी महसुल विभागास देण्यात आला होता व तहसीलदार भंडारा यांनी त्यांचे कडील पत्र क्र. अ.का./शा.जमीन/कावि/383, दिनांक 20/06/2024 अन्वये 6.53 हे.आर क्षेत्राचा ताबा वन विभागास देण्यात आल्याचे संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे. परंतु त्याबाबतचे आवश्यक दस्ताऐवज सहपत्रित करण्यात आलेले नाही.

तरी 6.53 हे.आर क्षेत्राचे ताबा हस्तांतरण बाबत आवश्यक दस्ताऐवज सादर करण्यात यावे.

**(पी.जी.कोडापे)**
विभागिय वनअधिकारी (दक्षता)
वनसंरक्षक (प्रा),
यांचे कार्यालय नागपूर

प्रतिलीपी:- अशोक लेलॅन्ड,1,MIDC, गडेगाव, भंडारा-441904 यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

Scanned with OKEN Scanner